## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर-५७६/२०२१**

**अपिलार्थी, श्री. निखिल लक्ष्मण कशिवले**

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
ग्रामपंचायत कार्यालय बेहरे (खडीवली),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ६०५

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती कल्याण यांचे कार्यालय
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३.६.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १७.८.२०२० | ---- | १४.१०.२०२० | --- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.१६.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३.६.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आजच्या सुनावणीस प्रथम अपिलिय प्राधिकारी हे कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत. त्यांची ही कृती योग्य नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल व त्या दिवशी प्रथम अपिलिय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहिल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. ७ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता घेण्यात येईल व त्या दिवशी प्रथम अपिलिय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जून, २०२२

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

सुनील पोरवाल
(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ